महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीद्वारे वि.वा.शिरवाडकर यांची अजरामर कलाकृती “नटसम्राट” चे गुजराती भाषेत दहा नाट्यप्रयोगाचे आयोजन करण्यास व त्यावरील खर्चास वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्र. गुसाअ-७१२६/प्र.क्र.१७६(E१७७७७६१)/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: ०५.०८.२०२६.

संदर्भ :-१) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. गुसाअ ७१२६/प्र.क्र.१७६ (ई.१६६०४४१)/सां.का.४, दि. २२ मे, २०२६
२) सहसंचालक यांचे पत्र क्र. जा.क्र./गु.सा.अ./१४५२-५३/२०२६, दिनांक २४/०७/२०२६.

प्रस्तावना :

राज्यामध्ये गुजराती भाषा आणि साहित्याच्या विकासासाठी महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमी कार्यरत असून या अकादमीद्वारे राज्यात गुजराती भाषा आणि साहित्याचे संवर्धन आणि विकास या संबंधी विविध उपक्रम राबविण्यात येतात. उपर्निर्दिष्ट क्र.१ अन्वये महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीद्वारे वि. वा. शिरवाडकर यांची अजरामर कलाकृती “नटसम्राट” चे गुजराती भाषेत नाट्यप्रयोग आयोजनास तसेच त्यासाठीच्या रु.३२,२०,०००/-इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. उपर्निर्दिष्ट क्र.२ अन्वये महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीद्वारे वि. वा. शिरवाडकर यांची अजरामर कलाकृती “नटसम्राट” चे गुजराती भाषेत नाट्यप्रयोग खर्चास वित्तीय मान्यता देण्याची विनंती सहसंचालक, गुजराती साहित्य अकादमी यांनी केली आहे. त्यानुषंगाने, सदर कार्यक्रम आयोजन खर्चास वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीद्वारे वि. वा. शिरवाडकर यांची अजरामर कलाकृती “नटसम्राट” चे गुजराती भाषेत नाट्यप्रयोग या आयोजनास तसेच त्यासाठीच्या रु. २५,६०,०००/- (अक्षरी पंचवीस लाख साठ हजार फक्त) इतक्या रकमेस या शासन निर्णयान्वये वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

०२. सदर खर्च लेखाशीर्ष मागणी क्र. झेडडी-२, २२०५ (१२) गुजराती साहित्य अकादमी, (१२) (०१) गुजराती साहित्य अकादमीची आस्थापना (कार्यक्रम), (२२०५ १७२१) ५०-इतर खर्च या लेखाशीर्षाखालील सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर असलेल्या आर्थिक तरतूदीतून भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०३. यासाठी सहसंचालक, महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली, गोरबंजारा साहित्य अकादमी यांना आहरण व संवितरण अधिकारी तसेच नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०४. सदर खर्चास वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/विनिमय, भाग-२, दि. १७ एप्रिल, २०१५, उपविभाग-३, नियम क्र. २७ (२) अ. नुसार प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार मंजूर करण्यात येत आहे.

०५. सदर प्रस्तावास वित्त विभाग शासन परिपत्रक क्र अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०९ एप्रिल, २०२६ मधील परिच्छेद व परिशिष्टातील अटींनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी सहसंचालक, महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती, संस्कृत, तेलुगु, बंगाली व गोरबंजारा साहित्य अकादमी यांची राहील.

०६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०८०५१२२४३९८५४३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

BALASAHEB ISHWAR SAWANT

Digitally signed by BALASAHEB ISHWAR SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, 2.5.4.20=79fcecc76dd8693a7bfcec682ee63eee2edaf06ba586ac71715d8e6ba4d62fbe, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=327FE83917B9691D96F2C6AEB03B51A86A595CCAC9264923EA4CD090FFD03E83, cn=BALASAHEB ISHWAR SAWANT
Date: 2026.08.05 12:25:26 +05'30'

(बाळासाहेब ईश्वर सावंत)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री, (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, सांस्कृतिक कार्य यांचे स्वीय सहाय्य, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. उप सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. सह संचालक, महाराष्ट्र राज्य हिंदी, सिंधी, गुजराती संस्कृत, तेलुगु, बंगाली, गोर बंजारा साहित्य अकादमी, ओल्ड कस्टम हाऊस, विकास विभाग इमारत, शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई ४०० ००१.
५. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. महा लेखापाल (लेखा परिक्षा) १ - महाराष्ट्र, मुंबई.
९. महा लेखापाल (लेखा परिक्षा) २ - महाराष्ट्र, नागपूर.
१०. महा लेखापाल (लेखा अनुज्ञेयता) १ - महाराष्ट्र, मुंबई.
११. महा लेखापाल (लेखा अनुज्ञेयता) २ - महाराष्ट्र, नागपूर.
१२. निवड नस्ती, सां.का.४.